जा. क्र./रा.भू.अ.आ.का.४/रा.स./३६/२०१८.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख कार्यालय (म.राज्य) पुणे.
दिनांक २२/०३/२०१८.

प्रति,
**डि.डि.ई. तथा उपजिल्हाधिकारी (सर्व.)**

विषय :- **ई-महाभूमी प्रकल्पांतर्गत डिजीटल स्वाक्षरीचा ७/१२ देण्यासाठी अचुक ७/१२ चे प्रख्यापन** आदेश काढणे **बाबत मार्गदर्शन सुचना.**
संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक क्र.रा.भू.अ.आ.का.४/रा.स.३३/२०१८ दिनांक १२/०३/२०१८चे मार्गदर्शक सूचनेबाबत पत्र.

संदर्भीय परिपत्रकान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांबाबत ई महाभूमी प्रकल्प अंतर्गत डिजिटल स्वाक्षरीने संगणकीकृत ७/१२ जनतेला उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्यक्ष कार्यवाही खालीलप्रमाणे करावी.

१. ज्या तालुक्यातील सर्व गावांचे घोषणापत्र-३ पुर्ण झाले आहे त्याच तालुक्यांना तहसिलदार यांच्या लॉगीनने user creation मधुन अचुक संगणकीकृत ७/१२ चे प्रख्यापन आदेश पारीत करता येतील याबाबतचे user manual सोबत जोडले आहे.
२. वरीलप्रमाणे प्रख्यापन आदेश काढण्यापुर्वी तहसिलदार यांनी आजअखेर तालुक्यात अस्तित्वात असलेल्या महसुली गावांची संख्या नमुद करावी. ( एकूण महसुली गावांची संख्या निश्चित करण्याबाबत उपविभागीय अधिकारी यांनी तालुक्याचे तहसिलदार, उपअधीक्षक भूमी अभिलेख व दुय्यम निबंधक यांची संयुक्त बैठक घेवुन एकुण महसुली गावांची संख्या कायम केली असेल. )
३. वरीलप्रमाणे तयार झालेला पुनर्लिखीत ७/१२ चा प्रख्यापन झालेल्या आदेशावर तहसिलदार यांनी पहिले पृष्ठ व शेवटचे पृष्ठ स्वाक्षरीत करुन जिल्हाधिकारी यांचे कार्यालयामार्फत त्याची एक प्रत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख या कार्यालयास सादर करावी.
४. या प्रख्यापण आदेशानंतर फक्त चालू नोंदी दर्शविणारा ( LIVE ENTRIES ONLY) ७/१२ दिसण्यास व डिजिटल स्वक्षरीसाठी उपलब्ध होईल .
५. वरीलप्रमाणे प्रख्यापनाचा आदेश पारीत केल्यानंतरच तलाठी यांना अश्या तालुक्यातील अचुक ७/१२ चे काम पुर्ण झालेल्या गावातील ७/१२ डिजीटल स्वाक्षरीत करुन पी.डी.एफ.( P.D.F.) मध्ये रुपांतरीत करता येतील. तदनंतर सदरचे ७/१२ जनतेला व तलाठी यांना महाभूमी संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन देता येतील. तथापि असे काम सुरु करण्यापूर्वी प्रत्येक तलाठी मंडळ अधिकारी यांना आपले संगणकावरील ACTIVE X काढून टाकून नवीन ACTIVE X डाटा सायनिंग काम्पोनंट DOWNLOAD करून INSTALL करावा लागेल .
६. DSP-RoR मधुन केलेल्या कामाचा प्रगती अहवाल डी.बी.ए. व तहसिलदार यांना पाहता येईल.

७. ज्या गावांत रि-एडिट मॉडयुल चे काम अचुकरीत्या पुर्ण झाले आहे त्याच गावातील प्रत्येक ७/१२ पुन्हा ऑन स्क्रीन पाहून तलाठयाने तो योग्य असल्याची पुन्हा खात्री करुनच डिजीटल स्वाक्षरीत करणे अपेक्षीत आहे.

८. घोषणापत्र -३ झाल्यानंतर सुध्दा उपविभागीय स्तरावरील क्रॉस चेकींग मध्ये काही ७/१२ मध्ये त्रुटी दिसुन येत असल्यास त्यामध्ये महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १५५ / २५७ अन्वये आदेश पारीत करुन घेऊन या आदेशाची ई-फेरफार मधुन रितसर फेरफार नोंद घेऊन दुरुस्त्या पुर्ण करण्यात याव्यात व त्यानंतरच अचुक ७/१२ ची खात्री करुन डिजीटल स्वाक्षरी करण्यात यावी. तसेच अहवाल १ व ३ मधील ७/१२ साठी देखील कलम १५५ / २५७ चे आदेश पारित करणे आवश्यक आहे .

९. जिल्हाधिकारी वाशिम यांचे विनंतीप्रमाणे ई-फेरफार आज्ञावलीमध्ये -

१) कलम १५५ चे आदेशाने खात्यात दुरुस्ती,

२) कलम १५५ चे आदेशाने फेरफार क्रमांक बदलणे व

३) १५५ चे आदेशाने नवीन ७/१२ तयार करणे.

या सुविधा विकसित करण्यात आल्या आहेत तथापि ज्या जिल्हयामध्ये अशा त्रुटी निदर्शनास आल्या असतील त्यांनी तालुका / गांवनिहाय त्रुटींची संख्या नमुद करुन या सुविधा मिळण्याची विनंती केल्यास आपल्या जिल्हयासाठी या सुविधा उपलब्ध करुन देता येतील.

वरीलप्रमाणे गुणवत्तापुर्वक काम पुर्ण करण्यासाठी तहसिलदार / उप विभागीय अधिकारी यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम १५५ / २५७ अन्वये गरजेप्रमाणे चौकशी पूर्ण करुन कलम १५५ / २५७ अंतर्गत आदेश पारित करणे आवश्यक आहे . तालुकास्तरावर व जिल्हा स्तरावर अशा आवश्यक प्राप्त प्रस्तावांची संख्या व आदेश पारीत प्रस्तावांची संख्या याचा नियमित आढावा घेणे आवश्यक आहे अन्यथा आपल्या जिल्हयाचे काम गुणवत्तापुर्वक होणार नाही याची समज सवर्च संबंधीत अधिकार्यांना देणेत यावी.

सदरच्या सुचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात ही विंनती.

आपला,

22/3/2015

( रामदास जगताप )
उपजिल्हाधिकारी तथा राज्यसमन्वयक,
जमाबंदी आयुक्त कार्यालय (म.राज्य) पुणे

प्रत :

१. उपविभागीय अधिकारी (सर्व)

२. तहसीलदार (सर्व)